दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३० • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१७ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा वाढदिवस

## चाहत्यांची एकच गर्दी अन शुभेच्छांचा वर्षाव






**अहेरी । प्रतिनिधी**

इस्टेटचे सहावे राजे माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.वाढदिवसानिमित्त चाहत्यांची राजवाड्यासमोर सकाळपासूनच एकच गर्दी केली होती. त्यात भाजप चे पदाधिकारी, घरचे मंडळी एवढेच नव्हेतर दुर्गम भागातील आदिवासी बांधव ही मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.सद्या राजवढ्यात वाढदिवस कार्यक्रमांला नागरिकांची एकच गर्दी होत आहे. त्यात राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा वाढदिवस असल्याने सर्वांचा आनंद द्विगुणित झाला होता. वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणात रोषणाई,रात्रीच्या सुमारास आतिषबाजी आणि डीजेच्या गजरात सर्वांचे लक्ष वेधले व संपूर्ण अहेरी राजनगरी दणाणून सोडले.

अहेरी इस्टेटचे ६ वे राजे तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव महाराज यांच्या वाढदिवस निमित्ताने दानशूर चौक, अहेरी येथे संध्याकाळी ७ वा.राजे फाऊंडेशन, अहेरी तथा दानशूरचा राजा गणेश मंडळ, अहेरी तर्फे भव्य लाडुतुला कार्यक्रम आयोजित केला गेला, त्यानंतर अहेरी शहरातील विविध चौकात केक कापून राजेंचा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. तरी ह्या सर्व कार्यक्रमांला राजें यांच्या चाहत्यांची मोठ्या संख्येने अलोट गर्दी केली होती. भेट देणाऱ्या चाहत्यांना व शुभेच्छांसाठी जेवणाची सुध्दा व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाला नागरिकांनी हजारोंच्या संख्येने हजेरी लावली होती. राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी समस्त उपस्थितांचे आशिर्वाद घेत आभार मानले.यावेळी राज घराण्याशी संबंधित निष्ठावंत प्राचार्य डॉ. मनोरंजन मंडल, प्राचार्य मारोती टिपले, संतोष उरेते, गिरीश मद्देरलावार,प्राचार्य अनिल भोंगळे, प्राचार्य संजय कोडेलवर, सेवानिवृत्त प्राचार्य विजय खोंडे, प्राचार्य अरुण गोटेफोडे, प्राचार्य तगरे, मुख्याध्यापक तालिब सय्यद, मुख्याध्यापक अनिल यावले, मुख्याध्यापक वांढरे, मुख्याध्यापक दीपक राय व दिलीप राय, मुख्याध्यापक प्रभाकर भुते, मुख्यध्यापक उराडे, प्रा रमेश हलामी, प्रा. तानाजी मोरे, प्रा. अतुल खोब्रागडे, प्रा. गोंडे, पर्यवेक्षक युवराज करडे, पर्यवेक्षक हंसराज खोब्रागडे, आदर्श राज्यस्तरीय शिक्षिका जयश्री विजय खोंडे, व्यापारी संघटनेतील इतर सदस्यगण, प्रकाश गुड्डेल्लीवार, रवी नेलकुद्री, मुकेश नामेवार,अमोल गुड्डेल्लीवार, संतोष मद्दीवार, विनोद जिल्लेवार, विकास तोडसाम, राकेश कोसरे, नगरसेवक विकास उईके, माजी नगरपंचायत अध्यक्ष हर्षाताई रवींद्र ठाकरे, नगरसेविका शालिनी पोहणेकर,संजय पोहणेकर, नगरपंचायतचे आजी–माजी नगरसेवक, भारतीय जनता पार्टीचे गडचिरोली तथा अहेरी विधानसभा क्षेत्रातील पाचही तालुक्यातील आलेले पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घेतलेले विविध सामाजिक उपक्रम

**राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळपासुनच विवीध ऊपक्रमांची रेलचेल राजेंच्या चाहत्यांनी दानशूरचा राजा गणेश मंडळ अहेरीकडून लाडूतुला करून मोठ्या उत्सवाने साजरा केले. एवढेच नव्हे तर सकाळपासून भाजपच्या कार्यकर्त्यांनी अहेरी विधानसभा क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेचा वलय त्यांच्या भोवती निष्ठेने वावरताना दिसतो. इस्टेट चे लाडक्या लोकनेत्याच्या वाढदिवसा निमित्ताने अहेरी विधानसभा क्षेत्रातील अहेरी, सिरोंच्या,मूलचेरा, एटापल्ली, भामरागड अशा पाच ही तालुक्यातील विविध ठिकाणी कार्यकर्ते यांनी केक कापून, रक्तदान शिबिर, मॅरेथॉन स्पर्धा, अन्नदान, ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळ व बिस्कीट वाटप, छात्रावास येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, गरजूंना कपडे वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांनी गडचिरोली जिल्ह्याचे विकास पुरुष, लोकनेते, अहेरी इस्टेट चे राजे तथा माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

**अहेरी विधानसभा क्षेत्रातील पाच ही तालुक्यातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते यांच्या माध्यमातून शुभेच्छाचा वर्षाव त्यांच्यावर करण्यात आला.मागील काही महिण्यांपासुन सुरु असलेला पक्षप्रवेशाचा धडाका पुन्हा वाढदिवसानिमीत्य सुध्दा दिसला. राजेंच्या वाढदिवसाच्या औचित्य साधुन पेरमीली, मन्नेराजाराम परिसर आणि सिरोंचा तालुक्यातील कोटापल्ली परिसरातील असंख्य कार्यकर्त्यांनी रुक्मिणी महालात भाजप मध्ये प्रवेश केला.**

### भला मोठा केक कापून वाढदिवस साजरा

**अहेरी उपविभागातील राजघराण्याशी संबंधित गणमान्य व्यक्ती, स्थानिक व्यापारी संघटना, विविध सामाजिक संस्थांची तथा पक्षांचे पदाधिकारी तसेच धर्मराव शिक्षण मंडळातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व नगरातील वार्डा–वार्डातील महिलांनी पुष्पगुच्छ व भेट देऊन राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्यावर शुभेच्छांच्या वर्षाव केला. राजमाता राणी रुक्मिणी देवी आणि कुमार अवधेशराव बाबा आत्राम आणि राजमाताच्या लहान बहीण राजकुमारी विजयश्री सिंह, प्रवीणराव बाबा,चित्तेश्वर बाबा,रामेश्वर बाबा आत्राम,विश्वनाथबाबा आत्राम, वैभव सोमकुवार या सर्वांनी भला मोठा केक कापून राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचा वाढदिवस साजरा केला.**




## अहमदनगर ते आष्टी रेल्वेला वाळूंज येथे भीषण आग, दोन डब्यांमधून आगीचे लोट



**आष्टी । प्रतिनिधी**

नगर– आष्टी रेल्वेला वाळूंज (ता. नगर) जवळ आग लागली आहे. प्राथमिक माहितीनुसार पहिल्या दोन डब्यांना लागली होती ती पुढे पाच डब्यांपर्यंत पोहोचली. गाडीत गर्दी नसल्याने सुदैवाने कोणालाही इजा नाही. स्थानिक ग्रामस्थ आणि अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले होते. आगीत रेल्वेचे मोठे नुकसान झाल्याचं समोर आलं आहे. आगीचं प्रमाण वाढल्यानंतर एकूण गार्ड ब्रेक कोच आणि चार डबे असे एकूण पाच डब्यांना आग लागली आहे. चार वाजताच्या दरम्यान आग विझवण्यात यश आलं.

अहमदनगर आणि आष्टी हा महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. या मार्गावरील रेल्वेला कोणत्या कारणामुळं लागली हे अद्याप समोर आलेलं नाही. आग कशामुळं लागली याचा शोध रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात येणार आहे. दुपारी ३ वाजून २४ मिनिटांनी आग लागल्याचं समोर आलं आहे. अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्यात त्यांना ४ वाजता यश आलं. या गाडीतील प्रवासी वेळेतच खाली उतरल्यानं बचावले आहेत. सुरुवातीला दोन डब्यांना आग लागली होती त्यानंतर आगीचं प्रमाण वाढल्यावर एकूण पाच डब्यांना आग लागल्याची माहिती रेल्वेकडून देण्यात आली आहे अहमदनगर आष्टी दरम्यानच्या रेल्वे सेवेला प्रवाशांचा फारसा प्रतिसाद नसल्यानं प्रवासी संख्या कमी होती. यामुळं या घटनेत जीवितहानी झालेली नाही. रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार दुपारी ३ वाजून २४ मिनिटांनी अहमदनगर तालुक्यातील वाळुंज येथे आष्टी अहमदनगर रेल्वेला आग लागली आहे. रेल्वेचे अधिकारी आणि अग्निशामक दल तसेच पोलिस घटनास्थळी पोहोचले आहेत.नगर–बीड–परळी या मार्गावर सप्टेंबर २०२२ मध्ये नगर ते आष्टी या काम पूर्ण झालेल्या टप्प्यात रेल्वेसेवा सुरू करण्यात आली आहे त्यानुसार सोमवार सकाळी नगरहून ही गाडी प्रवासी घेऊन आष्टीला गेली. तेथून परत येत असताना नगर तालुक्यातील शिराढोण या गावाजवळ आग लागली.नगर–सोलापूर महामार्गाच्या क्रॉसिंगजवळ ही घटना घडली. आग कशामुळे लागली हे अद्याप समजले नाही. आग लागल्याचे कळताच गाडी थांबविण्यात आली. गाडीत प्रवासी कमी होते. इंजिनच्या मागील दोन डब्यांनी पेट घेतला होता. याची माहिती नगरला कळविण्यात आल्यानंतर रेल्वेचे अधिकारी तसेच महापालिकेचे अग्निशामक दल घटनास्थळी रवाना झाले. तोपर्यंत आग पाच डब्यांपर्यंत पोहोचली होती. अखेर ४ वाजता आग विझवण्यात यश आले

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात माजी सरपंच सुधाकर जूनघरे यांना शिवसेना (उबाठा) पक्षात प्रवेश



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील आबमक्ता विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य सुधाकर जूनघरे व संचालक महादेव पेचे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्याला प्रेरित होऊन जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात उपनेते मनोज जामसुतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश घेतला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना प्रेरित होऊन ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या धर्तीवर जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा – भद्रावती विधानसभा क्षेत्रात पक्षाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविल्या जात आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, आरोग्य मदत तसेच दिव्यांगांना तीन चाकी सायकलचे वाटप व समाजातील गोर – गरीब , शेतकरी , शेतमजुर आणि समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी नेहमी तत्पर असतात. त्यांच्या या कार्याला प्रेरित होऊन तालुक्यातील आबमक्ता विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य सुधाकर जुनघरे व संचालक महादेव पेचे यांनी शिवसेना उपनेते कामगार नेते तथा माजी नगरसेवक मनोज जामसुतकर व मुंबई भायखळा संघटक सूर्यकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या नेतृत्वात शिवदूत बंडू डाखरे यांच्या सहकार्याने शिवबंधन बांधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. यावेळी उपजिल्हाप्रमुख अमित निवड विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, युवा सेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, ग्रामपंचायत सदस्य रघुनाथ खापणे, व समस्त पदाधिकारी, शिवसैनिक स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टोलमुक्तीची सुखस्वप्ने!

ज्या राजकीय नेत्यांच्या हातात टोलवसुलीची सूत्रे असतात, त्यांचीच विश्वासार्हता घसरल्यामुळे टोलव्यवस्थेवरचा सर्वसामान्यांचा विश्वासच उडाला, हे आहे खरे दुखणे. ऐन रहदारीच्या वेळेत टोलनाक्याशी लागलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा, आणि त्या खोळंबलेल्या वाहनांच्या कुशीत बसलेले दयनीय जीव हे चित्र आताशा आपल्या सगळ्यांच्याच परिचयाचे झाले आहे. टोलनाक्याची कमान दिसू लागली की वाहनात बसलेल्या मंडळींच्या कपाळाला एखादी तरी आठी पडल्याशिवाय राहात नाही.वाहनाचे मोल कर्ज काढून मोजता येते; पण वाहनसौख्याची ही किंमत मात्र कोणालाच मोजायची इच्छा नसते. हल्ली फास्टटॅगनामक यंत्रणा अनिवार्य झाली आहे. खात्यातून टोलची किंमत वसूल झाल्याशिवाय टोलनाक्याचे ते दांडके काही केल्या वाट करुन देत नाही. टोलची पावती फाडणे हा वायफळ खर्च वाटतो, म्हणून लोक नाके मुरडतात, असे नव्हे. टोल आणि टोलनाक्यांबद्दलची ही सार्वत्रिक तिडीक सकारण निर्माण झाली आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील टोलनाक्यांचा प्रश्न हाती घेतला, सोडला, पुन्हा हाती घेतला, असे अनेकदा घडले. सुमारे दशकभरापूर्वी टोलनाक्यांवरुन मनसेने बरेच ‘खळ्ळखट्यॅक’ केले होते. त्या उग्र आंदोलनामुळे काही टोलनाके यथावकाश बंदही झाले. महाराष्ट्र टोलमुक्त करण्याच्या बाता बहुतेक सर्वच राजकीय पक्षांनी मारुन बघितल्या.पण वाहनधारकांच्या खांद्यावर बसलेले हे टोलचे भूत आजही काही उतरलेले नाही, आणि उतरण्याची शक्यताही नाही. महाराष्ट्रातील टोलनाक्यांवर छोट्या चारचाकी, तीनचाकी किंवा दुचाकी वाहनांकडून टोल घेतला जात नाही, असे





विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी केल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला असेल; पण त्यामुळे टोलचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला, हे बरे झाले.रस्ता बांधून झाल्यावर त्याची किंमत वसूल करण्यासाठी आणि देखभालीसाठी टोल किंवा पथकर आकारण्याची चाल काही नवी नाही. पथकराचा मागोवा घेतला तर मानवी इतिहासात जवळपास अडीच हजार वर्षे मागे जावे लागेल. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही पथकराचे उल्लेख सापडतात, आणि रोमन साम्राज्यदेखील पथकराबाबत जागरुक असल्याच्या नोंदी आहेत.तेव्हा पथकरमुक्त प्रदेश ही निव्वळ थापेबाजी आहे, हे लक्षात घ्यायला हवे. जे अडीच हजार वर्षात जमले नाही, ते आत्ताच जमण्याइतकी सुबत्ता कुठून आणायची? त्यामुळे टोल अथवा पथकर वसूल केला जातो, याविषयी तक्रार नाही; प्रश्न आहे तो हा की, वसूल केलेले पैसे नेमके कुठे जातात याचा. याचे उत्तर मिळत नाही, ही मेख आहे. टोलवसुलीची यंत्रणा ज्या पद्धतीने काम करते, तिथेच रोगाचे मूळ असावे.टोलवसुली ही प्राय: रोख रकमेतच होते. फास्टॅगसारखी प्रणाली येईपर्यंत तरी ही वसुली शंभर टक्के रोखीतच काम करत होती. या रोख रकमेतील किती पैसे कंत्राटदाराला मिळतात, आणि सरकारी तिजोरीत किती पडतात, याचा चोख हिशेब कधीच उपलब्ध होण्यासारखा नसतो. टोलवसुलीची कंत्राटे कशी आणि कुणाला मिळतात, याच्या सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकायला किंवा वाचायला मिळतात, पण त्यावर अक्सीर तोडगा मात्र कधीच निघत नाही.टोलवसुलीतील अपारदर्शकतेमुळेच गंभीर सवाल उपस्थित होतो की, हे काही राजकीय नेत्यांचे आणि नोकरशहांचे उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे काय? गेल्या नऊ वर्षात देशातील महामार्गांचे जाळे लक्षणीयरीत्या वाढले, हे मान्य करावे लागेल. गेल्या नऊ वर्षात महामार्गांच्या बांधणीत ५९ टक्क्यांची वाढ झाली.२०१४ मध्ये देशात ९१ हजार किमीचे महामार्ग होते, त्यात तब्बल ४७ हजार किमीची भर पडली. याला खर्च येतो, आणि तो वाहनांच्या पथकरातून गोळा होणे अशक्य आहे. एकट्या महाराष्ट्रातले राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, अन्य निमशहरी अथवा ग्रामीण रस्ते यांची गोळाबेरीज काही लाख किलोमीटरमध्ये जाईल. रस्ते, उड्डाणपूल, पदपथ, भुयारी मार्ग बांधणे एकवेळ जमण्यासारखे; पण त्यांची देखभाल हा कळीचा मुद्दा ठरतो.यासाठी टोलचा सोपा मार्ग अवलंबला जातो. जगभरातील सर्वच देशांमध्ये हाच एकमेव उपाय केला जातो. टोल देण्यास कुणाची आडकाठी नसेल, नसावी. पण टोलच्या बदल्यात नागरिकांना काय मिळते? खराब रस्ते, खड्ड्यांचे साम्राज्य, वाहतुकीचे खोळंबे! टोलवसुलीचे फटके कारवाल्या श्रीमंतांनाच पडतात, सर्वसामान्य जनतेला त्याची फोडणी नसते, असा एक अर्धवट युक्तिवाद केला जातो. यात तथ्य नाही.जे भागधेय मोटारवाल्यांच्या वाट्याला येते, त्याची झळ पायी फिरणाऱ्या सामान्य गरीबालाही बसत असतेच. कारण खराब रस्ते अंतिमत: डबघाईला जाणाऱ्या अर्थव्यवस्थेला खड्ड्यांकडेच घेऊन जातात.टोलप्रकरणी आक्रमक झालेल्या ‘मनसे’ला तूर्त स्वच्छतागृहे, सौजन्य, सुस्थितीतील रस्ते आदींची आश्वासने मिळाली आहेत. टोलनाक्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून वाहने मोजण्याचा उपक्रमही सरकार आणि ‘मनसे’चे पक्षकार्यकर्ते राबवणार आहेत. हा प्रकार काही वर्षांपूर्वी झाला होताच.टोलमुक्तीचा पुकारा करत निवडणुकीचे राजकारण रंगवण्याचा कार्यक्रम मात्र न चुकता पार पाडला जातो. आता तर दिवाळीला टोलमुक्तीचा फटका फुटणार, अशा वावड्यांनी समाजमाध्यमे गजबजून गेली आहेत. हे चालायचेच. टोलवसुली हा सर्वपक्षीय खेळ आहे.ज्या राजकीय नेत्यांच्या हातात टोलवसुलीची सूत्रे असतात, त्यांचीच विश्वासार्हता घसरल्यामुळे टोलव्यवस्थेवरचा सर्वसामान्यांचा विश्वासच उडाला, हे आहे खरे दुखणे. या व्यवहारात थोडका पारदर्शीपणा आणला तरी पुष्कळ झाले.

# सीमान्त आणि सीमेपलीकडे

महाराष्ट्र हे उद्योगप्रधान राज्य आहे, असा समज आहे. तो खरा नाही. राज्यात पुष्कळ उद्योग आणि व्यापारी संस्था आहेत; पण राज्यात पीक विम्यासाठी नोंद झालेल्या शेतकऱ्यांची संख्या एक कोटी ७० लाख ६७ हजार आहे. या शेतकऱ्यांवर अवलंबून घरातले इतर निदान दोन किंवा तीन तरी सदस्य असतील. हा गुणाकार केल्यास राज्यात शेतीवर अवलंबून असणारी संख्या किती प्रचंड आहे, याचा अंदाज येईल. याशिवाय, राज्यात लाखो भूमिहीन शेतमजूर आहेत. महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नातला शेतीचा वाटा केवळ १२ टक्के आहे. म्हणजे, १२ टक्के उत्पन्नावर निम्म्या लोकसंख्येची गुजराण आणि ८८ टक्के उत्पन्न उरलेल्या निम्म्यांचे.महाराष्ट्रातली ही भयंकर विषमता आहे. दरवर्षी, वाढत्या कुटुंबांमुळे पडणारे जमिनीचे तुकडे, पावसाचा खेळ, रोगराई आणि बाजारभावांची सापशिडी यामुळे राज्यातला शेतकरी गांजला आहे. यंदा पावसाने शेवटी बऱ्याच महसूल मंडळांमध्ये सरासरी गाठली असली, तरी त्याचे अनियमित गैरवर्तन खरिपाच्या पिकांच्या जिवावर उठले आहे. या शेतकऱ्यांना सावरण्यासाठी राज्य सरकार कामाला लागले आहे की नाही, हे कळायला मार्ग नाही. पावसाच्या एकूण सरासरीत केवळ दहा टक्के घट दिसते आहे. मात्र, राज्यात बहुतेक जिल्ह्यांमध्ये पावसाने मध्येच तीन ते चार आठवड्यांची दडी मारली होती. यामुळे, पिकांच्या उत्पादनात यंदा ३५ ते ५० टक्के घट येईल, असा काही तज्ज्ञांचा अंदाज आहे. हा आकडा धोक्याची घंटा वाजविणारा आहे.

आजकाल देशात गहू, तांदूळ आणि



खाद्यतेले यांची टंचाई क्वचितच निर्माण होते. यातली खाद्यतेले आयात होतात. गहू आणि तांदूळ यांचे विक्रमी उत्पादन उत्तर भारतीय राज्ये आणि पंजाब घेत असतो. करोना काळात केंद्र सरकार दीर्घकाळ अन्नधान्य पुरवठा योजना यामुळेच चालवू शकले. मात्र, या उत्पादनातून महाराष्ट्रासारख्या सर्वाधिक धरणे असणाऱ्या, पण आजही लाखो एकर कोरडवाहू शेती असणाऱ्या राज्याचे प्रश्न समोर येत नाहीत. यंदाच्या पावसाने जी ओढ दिली आहे, तिचा सर्वाधिक फटका सोयाबीन आणि कापूस या पिकांना बसणार आहे. ही दोन्ही पिके विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात घेतली जातात. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा शाप संपलेला तर नाहीच; तो मराठवाडा आणि काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्राकडेही सरकला आहे. यंदाच्या पहिल्या आठ महिन्यात मराठवाड्यात ६८५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. पश्चिम विदर्भात हा आकडा ७३७ होता. आता कापूस आणि सोयाबीन यांनी ओढ दिल्यानंतर शेतकऱ्यांचे मनोधैर्य टिकविण्याची जबाबदारी केवळ कृषी खात्याची किंवा आजवर अपयशी ठरलेल्या आरोग्य खात्याच्या मानसिक आरोग्य कार्यक्रमाचीही नाही. यांची तर आहेच, पण राज्य सरकारची ही एकत्रित जबाबदारी आहे. पीकविमा आणि इतर योजनांबाबत सरकारला नेहेमीची सुस्ती झटकून चपळाई दाखवावी लागेल.यंदा सोयाबीनचा शेतकरी पावसाच्या ओढीमुळे संकटात होताच; त्यातच, ‘यलो मोझॅक’ या रोगामुळे तो हबकूनच गेला. आता खरिपाची ससेहोलपट विसरून रब्बीची तयारी कशी करायची, असा यक्षप्रश्न सगळ्याच शेतकऱ्यांच्या समोर उभा ठाकला आहे. सगळीकडे पंचनामे अद्याप सुरू झालेले नाहीत. ते वेगाने करावे लागतील. पीक आणि फळविमा उतरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत महाराष्ट्र देशात दुसरा आहे. राज्य सरकारने यंदा केवळ एक रुपयात पीक विमा घेण्याची सुविधाही दिली होती. मात्र, खरे आव्हान विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वेळेत मिळवून देण्याचे आहे. पीक विम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम त्वरित द्या, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. ती योग्य आहे. विमा कंपन्यांचे काही अधिकारी ही रक्कम देण्यास किमान एक महिना लागेल, असे म्हणत होते. ही सगळी प्रक्रिया तातडीने पुरी व्हायला हवी. नुकसान झालेल्या राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात ही अग्रीम रक्कम तातडीने जमा व्हायला हवी. आता सणासुदीचे दिवस तर आले आहेतच, पण त्याहीपेक्षा रब्बीची तयारी करावी लागेल. राज्यातल्या २२ जिल्ह्यांमधील किमान ४५७ महसूल मंडळांमध्ये पावसाने तीन आठवड्यांची ओढ निदान एकदा तरी दिली आहे. काही ठिकाणी ही ओढ अधिकच लांबली होती. अशा सर्व ठिकाणी विम्याची रक्कम देण्याचे काम वेगाने होणे आवश्यक होते. महाराष्ट्राची एकूण शेती १४५ लाख हेक्टर आहे. त्यातील १३९ लाख हेक्टरवर पेरणी झाल्याची आकडेवारी आहे. हे प्रमाण ९६ टक्के आहे. पण ज्या पेरण्या झाल्यात; तेथे अपेक्षेइतके पीक येणारच नसेल, तर या आकडेवारीला फारसा अर्थ उरत नाही. यातल्या अनेक दुबार पेरण्याही आहेत. राज्यातल्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या वेदना शहरांमधल्या झगमगाटी बाजारांमध्ये दिसत नाहीत; तशाच त्या राज्यात चाललेल्या राजकीय किंवा सामाजिक चर्चांमध्येही दिसत नाहीत. जमीन धारणा आणि उत्पन्न यात शेतकरी ‘सीमान्त’ होत चाललाच आहे; पण सगळे राजकीय पक्ष आणि महानगरी मानसिकतेने त्याला अदखलपात्र करून सीमांच्या पार फेकून दिला आहे.

## विकास कामांतून जनसामान्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध

# तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही-उपमुख्यमंत्री पवार







**अहमदनगर । प्रतिनिधी**

वसा विकासाचा, विचार बहुजनांचा हा विचार आपण संपूर्ण राज्यभर मांडत आहोत. जनतेचा विकास हाच आपला ध्यास असून विकास कामातुन जनसामान्यांना सर्व सोयी- सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिली.

पारनेर-अहमदनगर विधानसभा मतदारसंघात एलटी, एचटी ५६५ विद्युत वहिनी, १०० के.व्ही. च्या ३३६ रोहित्र उभारणीच्या कामाचे भूमिपूजन तसेच माता मोहटादेवी महिला देवदर्शन यात्रेचा शुभारंभ उपमुख्यमंत्री श्री पवार यांच्या हस्ते करण्यात आला.त्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी आमदार निलेश लंके, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातील जनतेला अखंडितपणे वीज पुरवठ्यासाठी विद्युत विकासावर भर देण्यात येत आहे. पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीपंपाला तसेच सर्वसामान्य व्यक्तीला शाश्वत व अखंडितपणे वीजेचा पुरवठा व्हावा यादृष्टीने ३९ कोटी ६५ लक्ष रुपयांचा निधी खर्च करुन ११ के.व्ही. क्षमतेची २७८ किलोमीटर लांबीची वीज वाहिनी टाकण्यात येत आहे. वीजेचा दाब आल्याने रोहित्रांवर ताण आल्याने ते नादुरुस्त होतात. सुरळीतपणे वीजेच्या पुरवठ्यासाठी १०० के.व्ही. क्षमतेचे ३३३ रोहित्रे बसविण्याबरोबरच ३१० किलोमीटर लांबीची थ्री फेज लघुदाब वाहिनीचे कामही या निधीतून करण्यात येणार आहे. वाडी-वस्तीवरील जे ग्राहक शेती वाहिनीवर आहेत त्यांना गावठाणवाहिनीवर स्थलांतरीत करुन अखंडीतपणे वीजेचा पुरवठा करणे यामुळे शक्य होणार आहे. पारनेर तालुक्यातील सुपा, पारनेर, वाडेगव्हाण, भाळवणी, कान्हूरपठार, टाकळी ढोकेश्वर, वडझिरे परिसरातील वीज ग्राहकांना याचा मोठा फायदा होणार असल्याचेही उपमुख्यमंत्री श्री पवार म्हणाले. पारनेर तालुक्याच्या विकासासाठी गतकाळात अकराशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या निधीतून पाणी पुरवठा योजना, जलसंधारणांची कामे, पाझर तलाव, पाणंद रस्ते, क्रीडाविकास, आरोग्य विकास, विविध इमारती यासारखी विकास कामे करण्यात आली आहेत. नागरिकांची मागणी असलेल्या उपसा सिंचन योजना, कोल्हापुरी बंधारे, तीर्थक्षेत्र विकास,रस्ते विकास, औद्योगिक विकास यासारख्या विकास कामांनाही निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. पारनेर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाहीही उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी यावेळी दिली.राज्यातील काही भागात पावसाने ओढ दिली आहे. अनेक भागामध्ये चांगला पाऊस झाला आहेत काही ठिकाणी अद्यापही पावसाची प्रतिक्षा आहे. राज्यातील काही भागांवर असलेले हे संकट टळू दे अशा शब्दात उपमुख्यमंत्र्यांनी मोहटादेवी चरणी साकडेही घातले. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मोहटादेवीचे महिलांना अखंडितपणे दर्शन घडविण्याचे काम आमदार निलेश लंके हे गेल्या सात वर्षांपासून करत आहेत. भाविकांची देवीप्रती असलेली श्रद्धा जपण्याचे श्री लंके यांचे काम उत्तम प्रकारचे व पुण्यांचे आहे. लोकसेवेचा वसा घेऊन जनतेच्या विकासासाठी अहोरात्र करण्यात येणारे आमदार लंके यांचे काम हे खरोखरच कौतुकास्पद असल्याचेही ते म्हणाले.आमदार निलेश लंके यांनी प्रास्ताविकात माता मोहटादेवी महिला देवदर्शन यात्रेबाबत तसेच मतदारसंघातील विकासकामांची माहिती विषद केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ११ के.व्ही. क्षमतेची २७८ किलोमीटर लांबीची वीज वाहिनी, १०० के.व्ही. क्षमतेचे ३३३ रोहित्रे तसेच ३१० किलोमीटर लांबीची थ्री फेज लघुदाब वाहिनीच्या कामाचे भूमीपुजन कोनशिला अनावरणाने करण्यात आले. तसेच माता मोहटादेवी महिला देवदर्शन यात्रेचा शुभारंभही करण्यात आला.कार्यक्रमास तालुक्यातील पदाधिकारी, अधिकारी, महिला तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महायोद्धा एकलव्य आदिवासी बहुउद्देशीय संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घटस्थापना करून आमरण उपोषण

## पाडण्यात आलेले देवीचे मंदिर ओटा पत्र्याचे शेड बांधून देऊन देवीची जागा बक्षीस पत्र करण्याची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

घाटशिरस ता.पाथर्डी येथील झुंबर माळी यांना जीवे मारण्याची धमकी देत पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या मंदिराचे ओटा पत्र्याचे शेड गावातील गैर अर्जदार यांनी तोडले यासंदर्भात पाथर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केलेला असून आम्हाला फक्त आश्वासन दिले व कारवाई केलेली नाही. त्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालय समोर घटस्थापना करून अन्न पाणी त्याग आमरण उपोषण करताना एकलव्य आदिवासी बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष झुंबर माळी, मनोहर माळी, संगीता माळी, शोभा माळी, सोमेश्वर माळी, प्रमिला माळी, भागवत गायकवाड आदी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की देवीचे पाडलेले ओटा मूर्ती पत्र्याचे शेड जाळी गेट बांधून देण्यात यावे तसेच देवीची जागा बक्षीस पत्र करून मिळावी व विटंबना करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी तसेच आदिवासी लोकांवरचे खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावे व गावठाण जागेतील आंबेडकर जयंती निमित्त लावलेला बोर्ड तो गावगुंडांनी काढून



दुसरीकडे लावलेला आहे. तो बोर्ड पुन्हा त्याच जागेवर लावण्यात यावा तसेच ग्रामपंचायत मधील ३७९ गटातील जागा पत्र्याचे शेड काढून मोकळे करून देण्यात यावी गायरान जमिनी आदिवासी लोकांच्या नावे करण्यात यावी गावातील गाव गुंडांपासून धोका होऊ नये त्यामुळे त्यांचे लेखी जबाब घेण्यात यावे व आदिवासी भूमिहीन लोकांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा तसेच आदिवासी वस्तीला ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत रस्ता, लाईट, पिण्याचे पाणी, अंगणवाडी शाळा या योजनेचा लाभ द्यावा व आदिवासी लोकांना पिवळे रेशन कार्ड मिळावे. आंबेडकर बोर्डाची विटंबना करणाऱ्यांवर ट्रॉसिटी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावे तसेच गाव गुंडांकडून आमच्या आदिवासी व्यक्तींना जीविताला धोका निर्माण झाला असून आत्मसुरक्षांसाठी शस्त्र परवाना मिळावा व अल्पवयीन मुलीची चेंगरून बालहत्या करून पुरावा नष्ट करणारा आरोपी बाबासाहेब चोथे यांच्यावर ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी या विविध मागण्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

## अहमदनगर-आष्टी रेल्वेला लागलेल्या भीषण आग प्रकरणी सखोल चौकशी व्हावी

## हरजितसिंह वधवा व प्रशांत मुनोत यांचे रेल्वे महाप्रबंधकासह रेल्वे मंत्री यांना ईमेलद्वारे निवेदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**





सोमवारी (१६ ऑक्टोबर) उशीरा सुटलेल्या अहमदनगर-आष्टीला रेल्वेला लागलेल्या भीषण आग प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी अहमदनगर पुणे इंटरसिटी रेल्वे कृती समितीचे हरजितसिंह वधवा व सोलापूर विभागीय सल्लागार समिती सदस्य प्रशांत मुनोत यांनी मागणी केली आहे. या मागणीचे निवेदन तातडीने रेल्वेचे महाप्रबंधक, सोलापूर विभागीय रेल्वे प्रबंधक आणि रेल्वे मंत्री यांना पाठविण्यात आले आहे.

२३ सप्टेंबर २०२२ पासून बीड-परळी रेल्वे मार्गावरील अहमदनगर-आष्टी ही रेल्वे सेवा सुरू करण्यात आली होती. सोमवारी ही रेल्वे आष्टी कडे जाताना सुमारे तीन तास उशिरा निघाली. परत येताना देखील ती रेल्वे उशीराच होती. दुपारी साडेतीनच्या दरम्यान सोलापूरवाडी- वाळूंज मार्गावरील रेल्वे क्रॉस जवळ असताना इंजिन शेजारील चार-पाच डब्यांना भीषण आग लागली. त्यानंतर एकच खळबळ उडाली.या गाडीत नेहमीच प्रवासी कमी असतात. तर गाडी उशिरा सुटल्याने प्रवासी अजूनही कमी होते. जे दहा-बारा प्रवासी होते त्यांनी आग लागल्यानंतर उडी मारून स्वतःचे जीव वाचविले. सुदैवाने कुठल ही जिवीतहानी झाली नाही. आग आटोक्यात आणण्यासाठी स्थानिक नागरिक, अग्निशमक दलाने प्रयत्न करून रेल्वे डब्यांना लागलेली आग विझवली. जेव्हापासून ही गाडी सुरू झाली, तेव्हापासून अनेक लोकांनी शंका उपस्थित केल्या आहेत. यापूर्वी या रेल्वेचे दोन फेऱ्या होत होते. परंतु त्या रद्द करून एक फेरी करण्यात आली. अशा परिस्थितीमध्ये गाडी उशिरा का सुटली?, सदर गाडीला आग कस काय लागली? हा मोठा प्रश्न आहे. गाडी आज उशिरा सुटल्याने त्यात काही घातपात करण्याचा उद्देश होता का? या सर्व प्रश्नांची उकल होण्यासाठी अहमदनगर-आष्टीला रेल्वेला लागलेल्या भीषण आग प्रकरणी सखोल चौकशी करण्याचे वधवा व मुनोत यांनी निवेदनात म्हंटले आहे. अहमदनगर-पुणे याला येत्या काळात मराठवाडा व विदर्भाला जोडण्यासाठी हा एक मोठा मार्ग आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. लागलेली आग ही संशयास्पद असून, याची चौकशी होणे गरजेचे असल्याची भावना असल्याने त्यात सदरात कशी आग लागली याची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी हरजितसिंह वधवा यांनी व्यक्त केली आहे.

## उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना मंठा शहरप्रमुखपदी वैजनाथ बोराडे यांची नियुक्ती



**मंठा । प्रतिनिधी**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए.जे. बोराडे यांनी शिवसेनेच्या शहरप्रमुख बाजार समितीचे संचालक वैजनाथ बोराडे यांची नियुक्ती केली आहे. शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री मा.उद्धव ठाकरे, उपनेते तथा संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांच्या मान्यतेने जिल्हाप्रमुख ए. जे.बोराडे यांनी ही नियुक्ती केली आहे. श्री वैजनाथ बोराडे यांनी राजकारणात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. नगरसेवक ते बाजार समितीचे संचालक पदावर काम करताना त्यांनी सामाजिक कार्याची भूमिका यशस्वीपणे पार पाडली आहे. त्यांच्या या नियुक्ती बद्दल बाजार समितीच्या सभागृहात जिल्हाप्रमुख तथा सभापती ए.जे.बोराडे यांनी वैजनाथ बोराडे यांचा सत्कार केला. यावेळी तालुकाप्रमुख अजय अवचार,बाजार समितीचे संचालक संतोष वरकड, नितीन राठोड, माजी नगराध्यक्ष बालासाहेब बोराडे, शिवसेना गटनेते अचित बोराडे, माजी पंचायत समिती सदस्य प्रदीप बोराडे,जे के कुरेशी, बाजखा पठाण, अरुण वाघमारे, विकास सूर्यवंशी, उबेद बागवान, दिनेश बोराडे,दिगंबर बोराडे, सचिन गायकवाड, गजानन बोराडे, महादेव खरात, नीरज सोमानी, भागवत चव्हाण, इलियास कुरेशी, पप्पू दायमा, अनिल हिरे यांची उपस्थिती होती.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठा मध्ये कॅरी ऑन पॅटर्न लागू करा-दत्ता खराटे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

डॉ दि.१५ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे अखिल भारतीय फार्मासिस्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्य व विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने आराखडा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्या बैठकीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणारे रायगड या विद्यापीठामध्ये बी फार्मसीला शिकत असताना विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अडचणी येत आहेत त्याबद्दल चर्चा करण्यात आली संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, सावित्राबाई फुले विद्यापीठ पुणे त्यासोबत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर या सर्व विद्यापीठांमध्ये कॅरी ऑन पॅटर्न लागू करण्यात आला आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणारे रायगड या विद्यापीठामध्ये का लागू होत नाही असा प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला विचारला आहे त्यामध्ये प्रामुख्याने बऱ्याच विद्यार्थ्यांचे विषय बॅक राहिल्यामुळे विद्यार्थी मानसिक तणाव मध्ये आहेत व विद्यार्थी टोकाचे निर्णय घेत आहेत त्यासोबत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी इतर युनिव्हर्सिटी प्रमाणेच डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ लोणारे रायगड या युनिव्हर्सिटी मध्ये पण कॅरी ऑन पॅटर्न लागू करण्यात यावा म्हणजे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान आपल्याला टाळता येईल व विद्यार्थी आत्महत्या सारखे टोकाचे निर्णय घेणार नाहीत व त्यासोबत येणाऱ्या वेगवेगळ्या अडचणीवर चर्चा करण्यात आली त्यामध्ये एम सी क्यू पॅटर्न लागू करण्यात यावा व सप्लीमेंट्री च्या अगोदर रीव्हॅल्युएशनचेचे फॉर्म ओपन करू नये वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली त्यावेळेस सर्व विद्यार्थ्यांनी कॅरी ऑन पॅटर्न लागू करावा या साठी सहमती दर्शवली आराखडा बैठकीत उपस्थित फार्मासिस्ट दत्ता मारोती खराटे प्रदेशाध्यक्ष अखिल



भारतीय फार्मासिस्ट असोसिएशन महाराष्ट्र यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना असे सांगितले की विद्यार्थ्यांनो तुम्ही एकजूट दाखवा आपण विद्यापीठाला कॅरी ऑन लागू करण्यासाठी भाग पाडू असे मत त्यांनी व्यक्त केले विद्यापीठाला वेळोवेळी निवेदन देऊन पण यावर कोणतेही क्शन विद्यापीठ घेत नाही.बैठकीमध्ये उपस्थित विद्यार्थ्यांनी असा निर्णय घेतला की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणारे रायगड येथील विद्यापीठाच्या गेट समोर लवकरच धरणे आंदोलन करण्यात येईल आपली मागणी मान्य होणार नाही तोपर्यंत आपण तिथून हटणार नाही असा निर्धार आज विद्यार्थ्यांनी आढावा बैठक मध्ये केला आहे आराखडा बैठकीला छत्रपती संभाजी नगर रिजन मधून वेगवेगळ्या बी फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते या मध्ये लांडगे मुंजा ,राठोड विशाल,सूर्यवंशी विनोद,पवार शुभम,शेळके आकाश,राठोड सुशील,खान इम्रान,महेश काळे,दर्शन सुरोशे व इतर फार्मसीस्ट बंधू उपस्थित होते.

## चंद्रपूर अग्रसेन समाजातर्फे श्री अग्रसेन जयंती महोत्सवाचे आयोजन

# अग्रसेन समाजाने संस्कारांची कास सोडली नाही-मंत्री ना.मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अग्रसेन समाज कायम आपल्या विचारांच्या मार्गावर चालत आला आहे आणि पुढच्या पिढीमध्ये त्या विचारांची प्रेरणा समाजातील लोकांनी निर्माण केली आहे. अग्रसेन समाज भारतीय संस्कृती, उत्सव, ऐतिहासिक वारशाबद्दल आग्रही राहिला आहे. आज जग कितीही बदलले असले तरीही अग्रसेन समाजाने संस्कारांची कास सोडलेली नाही, असे गौरवोद्गार राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी काढले.

चंद्रपूर अग्रसेन समाजातर्फे आयोजित महाराजा श्री अग्रसेन जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला रामदास अग्रवाल नागपूर, चंद्रपूर अग्रवाल समाजाचे अध्यक्ष वेदप्रकाश अग्रवाल, महानगरपालिकेचे आयुक्त विपीन पालीवाल, सतपाल जैन, शैलेश बागला, महिला अध्यक्ष कुसुम रुंगठा, महिला उपाध्यक्ष मायादेवी अग्रवाल यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ना. मुनगंटीवार यांनी सुरुवातीला महाराजा श्री अग्रसेन यांना अभिवादन केले. ते म्हणाले, 'अशा प्रसंगांना समाजातील सर्व लोक एकत्र येतात तेव्हा आनंद होतो. कारण याठिकाणी संवादाच्या माध्यमातून विचारांचे आदान प्रदान होत असते. 'मॅन इज ए सोशल एनिमल ते मॅन इज ए सेल्फीश एनिमल' असा मनुष्याचा प्रवास झाला आहे. त्यामुळे या काळात एकत्र येऊन संवाद साधणे हेच सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यामुळे आज अग्रसेन समाजातील बांधव एकत्र आलेत याचा विशेष आनंद आहे.' 'पूर्वी तंत्रज्ञानाचा अभाव होता पण सुखाचा प्रभाव होता. आता मोबाईल हाती आला आहे. कुटुंबातील लोक एकत्र आले तरीही मोबाईलमुळे लांब असल्यासारखे वाटतात. आज तंत्रज्ञानाचा, विज्ञानाचा प्रभाव आहे, पण आनंदाचा, सुखाचा आणि आपलेपणाचा अभाव आहे. अशा कार्यक्रमांतून हा



आपलेपणा वाढतो,' असेही ना.. मुनगंटीवार म्हणाले. 'छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा काढला, ती वाघनखे भारतात आणण्यासाठी करार करण्याकरिता मी लंडनला गेलो होतो. तेथील भारतीय लोकांना भेटल्यावर मला एका गोष्टीचे फार आश्चर्य वाटले. आपण भारतात राहून आपल्या भारतीय संस्कारांची जेवढी चर्चा करत नाही, त्यापेक्षा जास्त पटींनी तेथील भारतीय आपल्या संस्कारांच्या बाबतीत आग्रही आहेत. त्यानंतर जपानमध्ये कोबे शहरात गेलो होतो. तिथे दिडशे वर्षांपूर्वी भारतीय नागरिक मोत्यांचा व्यापार करायला आले. त्यांच्यातील आजच्या तरुण पिढीला भेटलो, तर भगवद्गीतेतील श्लोक त्यांना अतिशय सहजतेने म्हणताना बघितले. जपान आणि लंडनमध्ये राहून तेथील भारतीय संस्कारांबद्दल आग्रही आहेत, याचा अभिमान वाटतो,' अशी भावना ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

**अग्रसेन भवन ही फक्त इमारत नाही'**

**अग्रसेन भवनाबद्दल बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले, 'अग्रसेन भवन फक्त विटा आणि सिमेंटने उभी झालेली एक साधी इमारत नाही. हे समाजाचे, संस्कारांचे भवन आहे. याठिकाणी समाजातील तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत सारे एकत्र येऊन समाजाच्या कल्याणाचा विचार करणार आहेत. याठिकाणी आपलेपणाचा, प्रेमाचा भाव निर्माण होणार आहे.'**

# वरोरा येथे भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम यांची ९२ वी जयंती उत्साहात साजरी

**वरोरा । प्रतिनिधी**


डॉ. अब्दुल कलाम समिती व ऑल इंडिया कौमी तंजीम यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे ११ वे राष्ट्रपती आणि जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ भारतरत्न अवुल पकिर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांची ९२ वी जयंती येथील डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम चौकात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार ग.म. शेख हे होते.

कार्यक्रमात गुरुदेव सेवा मंडळाचे सेवा अधिकारी लक्ष्मणराव गमे, वाघ महाराज,प्रा .रुपलाल कावडे, डॉ .अंकुश आगलावे, झाडे, माजी कृषी अधिकारी खिरटकर, विनोद खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते , पत्रकार तथा माजी नगरसेवक राजेंद्र मर्दाने प्रामुख्याने उपस्थित होते.झाडे म्हणाले की, एक गरीब परिवारातील मुलगा ते महान वैज्ञानिक आणि देशाचे राष्ट्रपती असा डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जीवन प्रवास थक्क करणारा आहे.राजेंद्र मर्दाने म्हणाले की, डॉ.कलाम यांचे विचार सर्वांनीच आत्मसात करणे गरजेचे आहे. छोटुभाई यांच्या पुढाकाराने डॉ.कलाम चौक येथे या कार्यक्रमाचे आयोजन खरंच कौतुकास्पद आहे.आपल्या अध्यक्षीय भाषणात शेख म्हणाले की, डॉ. कलाम यांची तत्वे आणि विचारांशी असलेली बांधीलकी अनेकांना प्रेरक आहे.याप्रसंगी खिरटकर, विनोद कुत्तरमारे ,आगलावे, यांनी डॉ.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमात विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते सर्वश्री आदींची उपस्थिती होती.डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त एक शाम डॉ. कलाम के नाम व महाप्रसादा कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ६ वाजता केली. सदर कार्यक्रम




११ वाजेपर्यंत सुरू राहून १५०० नागरिकांनी सहभाग घेऊन सदर कार्यक्रमाचा आनंद व लाभ घेतला. या कार्यक्रमाला आमदार प्रतिभा धानोरकर , सामाजिक राजकीय नेते रमेश राजूरकर ,माजी नगराध्यक्ष अली ,डॉ सागर वझे ,माजी नगराध्यक्ष विलास टिपले ,प्रमोद वाभीटकर, विनोद लोहकरे ,सुरेश महाजन या व्यतिरिक्त निवासी तहसीलदार उल्हास लोखंडे , विनोद खोब्रागडे , आत्राम ज्येष्ठ नागरिक संघाचे पराते गुरुजी, मगरे ,पाल साव तसेच राजकीय व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी उपस्थिती दर्शवून कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन केले . या कार्यक्रमात सर्व समाजाचे प्रमुख व्यक्तींचा सत्कार करण्यात आला त्याचबरोबर किशोर चव्हाण पेंटर व रहमत बाबा गायक यांचे सुद्धा सत्कार करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता ऑल इंडिया कौमी तजीम व एपीजे अब्दुल कलाम उत्सव समितीचे.शेख जैरुदीन छोटूभाई त्यांचे सहकारी मुन्ना शेख ,मम्मु शेख, मोहसीन पठाण, कासिफ खान , शब्बीर . डोके परचाके . बांगडे . दशरथ शेडे .सचिन मेश्राम. कैसर शहा. बसीर शेख. विनोद .सुरज सर्वांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक रुपलाल कावडे यांनी केले आभार प्रदर्शन छोटू भाई यांनी केले हे सर्व कार्यक्रम शांततेत पार पडले.

## गोंडवाना विद्यापीठातर्फे आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव इंद्रधनुष्य २०२३चे आयोजन



**गडचिरोली । प्रतिनिधी**

आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव इंद्रधनुष्य २०२३ चे आयोजन विद्यार्थी विकास विभाग ,गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली यांच्यातर्फे करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन १७ ऑक्टोंबर ला सुमानंद सभागृह, आरमोरी रोड,गडचिरोली येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे ,उद्घाटक म्हणून दक्षिणात्य सिनेअभिनेत्री तथा मॉडेल अलिशा मेनाली (गोंडवाना विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी), प्रमुख अतिथी म्हणून प्र- कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ.अनिल हिरेखण,आयोजक संचालक(प्र.) विद्यार्थी विकास डॉ. प्रिया गेडाम आदी उपस्थित राहतील. हा महोत्सव १७ ते १९ ऑक्टोबर असा तीन दिवसीय चालणार आहे .या सांस्कृतिक महोत्सवाला उदघाटना नंतर लगेचच सुरुवात होणार असून यात शास्त्रीय नृत्य ,लोकनृत्य, मूकनाट्य, नकला , शास्त्रीय संगीत, सुगम संगीत ,समूहगीत, शास्त्रीय तालवाद्य ,संगीत शास्त्रीय ताण वाद्य ,पाश्चिमात्य गायन ,लोकसंगीत वाद्यवृंद, वादविवाद स्पर्धा ,वकृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा , रांगोळी ,स्थळ छायाचित्रण ,स्थळ चित्र ,पोस्टर मेकिंग ,व्यंगचित्र ,माती कला, चिकट कला, एकांकिका ,प्रहसन , शॉर्ट फिल्म,स्पॉट फोटोग्राफी या स्पर्धांमध्ये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयाचे जवळपास ७००विद्यार्थी सहभागी होणार आहेत.या इंद्रधनुष्य महोत्सवाचा समारोप १९ ऑक्टोबरला होणार आहे. या महोत्सवात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण आणि या कार्यक्रमाचे आयोजक डॉ. प्रिया गेडाम यांनी केले आहे.

# द्राक्ष,बेदाणा,टोमॅटो, दुध उत्पादकांचा कापसेवाडी येथे मेळावा

**कुर्डू** – द्राक्षाचे भाव गडगडल्या मुळे त्यातुन सावरण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर बेदाणा तयार केला .त्यामुळे बेदाण्याचे दर कोसळले.सध्या गगनाला गेलेले टॉमेटो चे दर ही कोसळले असुन दुध उत्पादक ही दर कमी झाल्याने अडचणीत आले आहेत.या सर्व शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी देशांचे माजी कृषिमंत्री शरदचंद्र पवार २३ ऑक्टोबर, सोमवार रोजी सकाळी दाहा वाजता कापसेवाडी येथे येणार आहेत.अशी माहिती कृषीनिष्ठ परिवाराचे नितीन कापसे यांनी दैनिक सकाळ शी बोलताना दिली .यावेळी योगेश जाधव, हनुमंत खताळ व कृषीनिष्ट परिवाराचे सदस्य उपस्थित होते .मागील वर्षी पावसाळा हंगाम चांगला असल्यामुळे अनेक ठिकाणी द्राक्षाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन झाले . परिणामी द्राक्षाला पंधरा ते विस रुपये किलो दर इथपर्यंत निचांकी दर मिळाला बेदाणा तयार केले त्याचे दर गडगडले आहेत.बेदाण्याला ५० रुपये अनुदानाची मागणी



होत आहे.सध्या टोमॅटो ला दर मिळत नसल्या मुळे शेतकऱ्यानी टोमॅटोचे प्लॉट सोडून दिलेले आहेत त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे.माढा लोकसभा मतदारसंघात खासदार सुप्रिया सुळे यांचा नुकताच कुर्डूवाडी येथे कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला असुन लगेच पंधराव्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा दौऱ्यावर येत असल्याने राजकारणी तर्क वितर्क लावून चर्चेला उधाण आले आहे.

# राज्याची समृद्धी होण्याऐवजी अपघातांची 'समृद्धी' का होत आहे?:याचा आता तरी गांभीर्याने शोध घ्या, उद्धव ठाकरे

**मुंबई**–समृद्धी महामार्गावरील प्रवास म्हणजे डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार ठरत आहे. डिसेंबर २०२२ मध्ये या महामार्गाचे उद्घाटन झाले, तेव्हापासून मागील नऊ महिन्यांत 'समृद्धी'वर चारशे-साडेचारशे छोटे-मोठे अपघात झाले आहेत. त्यातील बळींची संख्या दीडशेपेक्षा जास्त आहे. सरकार मात्र फक्त शोक व्यक्त करणे आणि आर्थिक मदतीचे आकडे जाहीर करणे एवढेच करीत आहे. हा 'मृत्यू महामार्ग' का बनला आहे, राज्याची समृद्धी होण्याऐवजी अपघातांची 'समृद्धी' का होत आहे, याचा आता तरी गांभीर्याने शोध घ्या, असा खोचक सल्ला उद्धव ठाकरे गटाने राज्य सरकारला दिला आहे. सामनामधून त्यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.महाराष्ट्रात 'घटस्थापना' होत असताना समृद्धी महामार्गावर अपघात घडला व १२ प्रवाशांचे बळी गेले. छत्रपती संभाजीनगरच्या वैजापूर-अगरसायगाव महामार्गावर हा अपघात घडला. समृद्धी महामार्ग लोकांची सोय व्हावी म्हणून बनवला की लोकांना असे निर्घृण मरण यावे म्हणून बनवला? असा एकही दिवस जात नाही की समृद्धी महामार्गावर अपघात घडला नाही अशी बातमी येत नाही. शनिवारी मध्यरात्री सैलानी बाबांच्या दर्शनावरून परतणाऱ्या भाविकांची टेम्पो ट्रव्हलर एका ट्रकला पाठीमागून धडकली. त्यात १२ जणांचा बळी गेला. हे सर्व मृत्यू जागीच झाले. पुढे धावणाऱ्या ट्रकने अचानक ब्रेक दाबल्याने मागे असलेली टेम्पो ट्रव्हलर त्यावर जोरात धडकली, असे सांगण्यात येत आहे. असेही सांगितले गेले की, या ट्रकचा पाठलाग आरटीओची गाडी करीत होती. त्यातून ट्रक चालकाने अचानक ब्रेक मारला आणि हा अपघात झाला. हे जर खरे असेल तर ट्रकचा पाठलाग का होत होता? या प्रश्नाचे उत्तर या अपघाताबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या सरकारने दिले पाहिजे. सरकारने जरूर शोक व्यक्त करावा, पण ट्रक आणि आरटीओ पाठलाग हे कोडेही जनतेला सोडवून सांगावे. हा पाठलाग असेल अथवा नसेल, पण समृद्धी महामार्गावरील प्रवाशांचा पाठलाग 'यमदूत' मात्र नक्कीच करीत आहे.गेल्या वर्षभरात या महामार्गावर झालेले अपघात आणि दुर्घटना, त्यातील बळींची मोठी संख्या हेच सिद्ध करते. समृद्धी महामार्गावरील प्रवास म्हणजे डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार ठरत आहे. डिसेंबर २०२२ मध्ये या महामार्गाचे उद्घाटन झाले, तेव्हापासून मागील नऊ महिन्यांत 'समृद्धी'वर चारशे-साडेचारशे छोटे-मोठे अपघात झाले आहेत. त्यातील बळींची संख्या दीडशेपेक्षा जास्त आहे. सरकार मात्र फक्त शोक व्यक्त करणे आणि आर्थिक मदतीचे आकडे जाहीर करणे एवढेच करीत आहे. हा 'मृत्यू महामार्ग' का बनला आहे, राज्याची समृद्धी होण्याऐवजी अपघातांची 'समृद्धी' का होत आहे, याचा आता तरी गांभीर्याने शोध घ्या. दोनच दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरजवळील या महामार्गाचा काही भाग सुमारे पाच इंच जमिनीखाली खचल्याची बातमी फोटोसह प्रसिद्ध झाली. दर्जा आणि गुणवत्तेबाबत छातीठोकपणे खात्री दिल्या गेलेल्या महामार्गाची ही अवस्था का व्हावी? या भागात महामार्गावर धावणारी वाहने मध्येच 'जम्प' घेतात असेही काहींचे म्हणणे आहे. ते जर खरे असेल तर त्यामुळे 'समृद्धी'च्या बांधकाम पद्धतीवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह अधिक गडद होणार आहे.'गेम चेंजर' वगैरे म्हटल्या गेलेल्या समृद्धी महामार्गाच्या गुणवत्तेबाबत, बांधकाम पद्धतीबाबत अनेक शंका, असंख्य आक्षेप घेतले गेले. मागील दहा महिन्यांतील प्रत्येक अपघाताने या शंका, आक्षेप खरेच ठरविले. त्यात आता शनिवारी मध्यरात्री वैजापूरजवळील भीषण अपघाताची भर पडली. आणखी किती अपघात होऊ देणार आहात? अपघात आणि त्यातील बळी यांबाबत फक्त सहवेदना प्रकट करून आर्थिक मदत जाहीर केल्याने समृद्धी महामार्गावरील अपघात व अपघाती बळींचे दुष्टचक्र थांबणार नाही. शनिवारी रात्री झालेल्या अपघाताबद्दल आता पंतप्रधानांनीही शोक प्रकट केला. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनीही दुःख व्यक्त केले. हा सरकारी सोपस्कार ठीक आहे, मात्र हे अपघातग्रस्तांच्या दुर्दैवी मृत्यूंचे खरे प्रायश्चित्त नाही. समृद्धी महामार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांवरून ज्या शंका आणि आक्षेप घेतले गेले आहेत त्याबाबत राज्य सरकारने कोणती पावले उचलली आहेत? 'समृद्धी', अपघात आणि शोक हे दुष्टचक्र कधी थांबणार? शनिवारच्या अपघातात हकनाक मरण पावलेल्या १२ भाविकांच्या शोकसंतप्त आत्म्यांचे हे सवाल आहेत. या महामार्गाला स्वतःचा 'ड्रीम प्रोजेक्ट' म्हणवून घेणाऱ्यांकडे या प्रश्नाचे काय उत्तर आहे?

# सोनके- तिसंगी ४०० कुसेकने पाणी सोडले हा निव्वळ लोकांची थट्टा; सांगोला तालुक्यात ओढ्यानाल्याना पाणी

**तिसंगी –** तिसंगी-सोनके तलाव पूर्ण क्षमतेने भरून देण्याचे आश्वासन राजकीय नेतेमंडळी व अधिकारी वर्गानी आंदोलन कर्तासमोर मान्य केले होते. त्यानुसार सोनके तलावामध्ये ४०० कुसेस पाणी सोडण्यात ही आले होते. परंतु अधिकाऱ्यांना काही राजकीय दबाव आल्याने ते पाणी कमी करून पुन्हा १०० कुसेक पाणी सोडण्यात आले तर आज मितिस पुर्ण बंद केल्याने आम्हा शेतकऱ्यांवय उपोषण करण्याची वेळ आली आहे. अधिकारी वर्गानी शेतकरी वर्गाची थट्टा लावली आहे. तिसंगी-सोनके तलावावरती अवलंबून असणाऱ्या गावावरती संबंधित अधिकारी नेतेमंडळी वारंवार अन्याय करत आहेत. दुसरीकडे या आवर्तनामध्ये येत नसणारे ओढे-नाले यांना राजरोसपणे पाणी सोडण्यात येत आहे. तलावातील पाणी सांगोला तालुक्याच परिसरातून राजकीय नेतृत्वाविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.सांगोला तालुक्यामध्ये काही भागांमध्ये या आवर्तनामध्ये नसलेले कॅनॉल ओढून आले यालाही पाणी दिले जात आहे. नियमाप्रमाणे सोनके तलाव भरण्याचा नियम असताना सुद्धा या तलावांमध्ये पाणी भरून तो पूर्ण क्षमतेने भरण्यात येत नाही सांगोल्यातील राजकीय नेते मंडळी मात्र आपापल्या परिसरामध्ये पाणी सोडून आतापासूनच आपली पुढील तयारी करण्याच्या मार्गावर दिसत आहे.तलावा खालील असणारी काही गावे मतदार संघात नसल्यान रिजकिय द्वेशापोटी पाण्यापासुन वंचित राहणार आहेत. तलाव वेळेत भरला नाही तर परिसरातील ११ गावाना दुष्काळाशी सामना करावा लागणार आहे. अधिकारी वर्गास विचारणा केल्यास त्यांच्याकडून कोणत्याच प्रकारचे उत्तर येत नाहीत. पाण्याचे नियोजन विचारले असता. राजकीय दबावा सोडले. पाऊस वेळेत न पडल्याने कॅनॉलला आवर्तनाच्या पाण्याची मागणी निर्माण झाली आहे. दुसरी बाजू पाहिली असता पंढरपूर तालुक्यातील आजी -माजी लोकप्रतिनिधी सोनके-तिसंगी तलाव भरून देण्याच्या दृष्टीने कोणतेच पावलेउचलताना दिसत नाहीत. पंढरपूर तालुक्यातील वंचित ठरलेला भाळवणी गट नाराज असताना दिसत आहे. दरम्यानचा कालावधीमध्ये ४०० कुशकणे पाणी सोडण्यात आले होते. राजकीय मंडळी तलाव परिसरातील शेतकऱ्यांची थट्टा करताना दिसत आहेत.तिसंगी-सोनके तलावाखालील ११ गावातील शेतकरी वर्गासाठी पुन्हा इनलेट नाला तिसंगी येथे समाधान फाटे याचे उपस्थित शेतकरी वर्गानी उपोषण सुरू केले आहे.गेली दोन दिवस झाले मी व शेतकरी तलावात पाणी सोडा या मागणीसाठी उपोषण बसलो आहे. पण कोणी राजकीय पुढारी व अधिकारी वर्गाने विचार पुस सुद्दा केली नाही. तिसंगी-सोनके तलावात पाणी सोडल्या शिवाय उपोषण मागे घेणार नाही..सोनके तिसंगी तलाव भरण्यासाठी पंढरपुरातील आजी-माजी लोकप्रतिनिधी व राजकीय नेते मंडळी प्रामाणिकपणे प्रयत्न करताना दिसत नाहीत तर दुसरी बाजू पाहिली असता सांगोला तालुक्यातील नियमात बसत नसणाऱ्या सुद्धा कॅनॉल पुढे नाल्यांना पाणी सोडण्याचे काम सुरू आहे हा कुठला न्याय सोनके-तिसंगी तलाव शंभर टक्के भरून देण्यासाठी प्रतिनिधींनी प्रामाणिक प्रयत्न करावा...

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .